| वर्ष - 8 | अंक -95 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### वाचकांना निवेदन

आज शनिवार, दिनांक 12 ऑक्टोबर रोजी विजयादशमी, दसऱ्यानिमित्त महाईन्यूजच्या कार्यालयास सुट्टी असल्यामुळे उद्या रविवार, दिनांक 13 ऑक्टोबर रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

-संपादक

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 12 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## नवनगर प्राधिकरणाने उभारलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना

# आता 'फ्री होल्ड'चा पर्याय!

## » राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रीमंडळात प्रस्तावाला मंजुरी

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण प्रशासनाने बांधलेल्या गृहनिर्माण सोसायटी व गृहप्रकल्प 'फ्री होल्ड' करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे प्राधिकरण हद्दीतील सुमारे ११ हजार २१३ सदनिका आणि ४९५ गाळेधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी प्राधिकरण हद्दीतील सरसकट मालमत्ता 'फ्री होल्ड' करण्याबाबत राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. गुरूवारी झालेल्या कॅबिनेट बैठकीत सिडको महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी भाडेपट्टयाने वाटप केलेले भूखंड व निवासी मालमत्ता कब्जेहक्काने वाटप करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.**









### मिळकती 'फ्री होल्ड' करण्याचा निर्णय ऐच्छिक...

मुंबई येथे झालेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये आमदार लांडगे यांनी विधानसभा सभागृहामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले. त्यावेळी कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी सदर मिळकती पीएमआरडीए आणि पीसीएमसी यांना अर्थिक भार पडणार नाही. याची पडताळणी करुन 'फ्री होल्ड' करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर गुरुवारी झालेल्या कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत संबंधित प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मिळकतधारकांना मिळकती 'फ्री होल्ड' करण्याचा पर्याय ऐच्छिक आहे. या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे भोसरी विधानसभा मतदार संघातील इंद्रायणीनगरमधील सेक्टर- २ मध्ये १ ते ७० बिल्डिंग पोलीस वसाहत आणि राजवाडा, चिखली- पूर्णानगरमधील सेक्टर-१८ मध्ये शिवतेजनगर, पोलीस लाईन, सचिन संकूल, कृष्णानगर, फुलेनगर, सेक्टर- २०, निगडी-यमुनानगरमधील सेक्टर- २१ मध्ये स्कीम- १ ते १२ या भागात तत्कालीन नवनगर प्राधिकरणाने बांधलेल्या गृहनिर्माण सोसायट्या 'फ्री होल्ड' करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> राज्य शासनाने नवनगर प्राधिकरण हद्दीतील ९९ वर्षांच्या भाडेपट्टयाने ११ हजार २१३ सदनिका तसेच दुकाने, दालने व ऑफीस ४९५ या मालमत्ता 'फ्री होल्ड' करण्याचा निर्णय व्यापक जनहिताच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. सदर मिळकती 'फ्री होल्ड' करण्यासाठी ऐच्छिक पर्याय आहे. आम्ही सुरू केलेल्या लढ्यातील पहिला टप्पा यशस्वी झाला आहे. आता दुसऱ्या टप्प्यात महानगरपालिका ताब्यातील निवासी ८ हजार ३७९ भूखंड व त्यावरील मालमत्ताधारक यांना या निर्णयाच्या कक्षेत घेण्यासाठी पाठपुरावा करत आहोत. महायुती सरकार या संदर्भात सकारात्मक आहे. प्राधिकरण हद्दीतील मालमत्ताधारक व अंदाजे ५ लाख नागरिकांना दिलासा मिळणार आहे.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

विशेष म्हणजे, सदर मालमत्ता 'फ्री होल्ड' करण्याबाबत मालमत्ता धारकांना ऐच्छिक योजना सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे मालमत्ताधारक कब्जेहक्कामध्ये रुपांतर करण्यासाठी पुढे येत नसेल किंवा विक्रीदरम्यान रुपांतरासाठी अर्ज करत नसेल, तर त्या मालमत्ताधारकाने भाडेपट्टयाच्या अटींनुसार मालमत्ता धारक करणे सुरू ठेवण्याचा पर्याय आहे. तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भूसंपादन कायदा १८९४ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदींनुसार जमिनी संपादित केल्या आहेत. प्राधिकरणाचे विलिनीकरण २०२१ मध्ये पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणमध्ये करण्यात आले. त्यानंतर प्राधिकरणाच्या मालमत्तांचे विभाजन पीएमआरडीए आणि पीसीएमसी अशा दोन अस्थापनांमध्ये झाले. प्राधिकरण हद्दीतील मालमत्तांचे हस्तांतरण आणि नूतनीकरण या बाबींसाठी किचकट प्रक्रिया आणि विविध तांत्रिक अडचणी यामुळे नागरिकांमध्ये नाराजी होती. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी प्राधिकरणाच्या हद्दीतील सर्व प्रॉपर्टी 'फ्री होल्ड' कराव्यात याबाबत राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू केला.

# शिक्षण करताना आता रोजगारही!

## टाटांची नोकरी अन् 11 हजार पगार; चंद्रकांतदादांचा मास्टर प्लॅन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आणि उत्सवाच्या निमित्ताने उपासनेचे फळ सर्वांना लाभावे यासाठी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या पुढाकारातून कोथरुडमध्ये भव्य दिव्य अशा महा कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी ( दि. ११) करण्यात आले होते. राज्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणातील कन्यापूजन सोहळ्याने उपस्थित भारावून गेले.**

या सोहळ्यात नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी स्वत: मंत्रोच्चाराच्या घोषात, आध्यात्मिक पद्धतीने सात मुलींचे पूजन केले. यावेळी सहभागी मुलींचे डोळे पाणावून गेले. चंद्रकांतदादा पाटील यांच्या या उपक्रमाचे उपस्थित मुलींनी व त्यांच्या पालकांनी मोठे कौतुक केले. धार्मिक श्रद्धांनुसार,नवरात्रोत्सव काळातील नवमी तिथीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी दुर्गा देवीच्या नऊ रूपांची मुलींच्या रूपात पूजा केली जाते. या उपासनेने दुर्गा मातेचा आशीर्वाद प्राप्त होतो आणि भक्तांच्या जीवनात सुख-समृद्धी येते, अशी श्रद्धा आहे. यासोबतच कन्यापूजना शिवाय नवरात्रीची उपासना यशस्वी होऊ शकत नाही, अशी देखील धारणा आहे. यानुसार या कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी या अद्भूत सोहळ्यात हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला. केवळ कोथरूड भागातील नव्हे तर सर्व पुणे शहरातून या सोहळ्यासाठी मुलींनी व त्यांच्या पालकांनी हजेरी लावली.यावेळी बोलताना



नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी, दरवर्षी १ लाख मुलींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे त्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल असे अश्वासन उपस्थित संस्था ना दिले. तसेच १ नोव्हेंबर पासून १ हजार माता भगिनींना ११ हजार मासिक वेतन मिळेल अशी नोकरी दिली जाईल असे ही सांगितले. शक्ती, बुद्धी आणि धनधान्य देणाऱ्या मातांची रूपे वेगवेगळी असून,लहान मुलींमध्ये ही रूपे दिसत असल्याच्या भावना व्यक्त केल्या. कन्या हे देवीचे स्वरूप असते. तिच्या जन्माने प्रत्येक कुटुंबात सुख, समृद्धी आणि भरभराट होते.ते पुढे म्हणाले की, नवरात्रोत्सव काळात तिची पूजा म्हणजे साक्षात, आदिमायेची पूजा करणे आहे. मागील पाच वर्षांत कोथरुड मधील मुलींचे आयुष्य सुरक्षित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. सुकन्या समृद्धी योजनेच्या माध्यमातून हजारो मुलींचे पालकत्व स्वीकारले आहे. त्यासोबतच मानसी सारख्या उपक्रमातून वस्ती भागातील मुलींच्या व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे कोथरूड मध्ये आयोजित महा कन्यापूजन सोहळा आयोजित करण्यात आला असल्याचे यावेळी पाटील यांनी सांगितले.

### मुलींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे

दरवर्षी १ लाख मुलींना स्वरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे त्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल असे अश्वासन उपस्थित संस्था ना दिले. तसेच १ नोव्हेंबर पासून १ हजार माता भगिनींना ११ हजार मासिक वेतन मिळेल अशी नोकरी दिली जाईल असे ही सांगितले. शक्ती, बुद्धी आणि धनधान्य देणाऱ्या मातांची रूपे वेगवेगळी असून,लहान मुलींमध्ये ही रूपे दिसत असल्याच्या भावना व्यक्त केल्या. कन्या हे देवीचे स्वरूप असते. ते पुढे म्हणाले की, नवरात्रोत्सव काळात तिची पूजा म्हणजे साक्षात, आदिमायेची पूजा करणे आहे. मागील पाच वर्षांत कोथरुड मधील मुलींचे आयुष्य सुरक्षित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत.

---

# रावण दहन कार्यक्रमात येणार 'चांडाळ चौकडीच्या करामती' ची टीम

## रावणाबरोबर सेल्फी काढण्यासाठी आबालवृद्धांनी केली गर्दी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशभरात नवरात्र-दसऱ्याचा सण साजरा होत आहे. या सणांबाबत लोकांमध्ये एक वेगळाच उत्साह असतो. रावण दहन देखील दरवर्षी मोठ्या थाटामाटात केले जाते.लोकनेते लक्ष्मण जगताप' मित्र परिवाराच्या वतीने भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महाभोंडला आणि रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

यात 'चांडाळ चौकडी' चे लोकप्रिय रामभाऊ, बाळासाहेब, सुभाषराव या कलाकारांची टीम सांगवीच्या पी डब्लू डी मैदानावर रावण दहनासाठी पोहोचणार आहे.

त्याचबरोबर महिलांच्या करिता महाभोंडला कार्यक्रमाची ही जय्यत तयारी करण्यात आली आहे. दसऱ्याला रावण दहन करून आपण प्रभू श्रीरामाचा विजयोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करतो. या दिवशी प्रभू श्रीरामाने कात्यायनी देवीची पूजा करून रावणाशी युद्ध पुकारले. रावणाच्या बलाढ्य सेनेला तोंड देत दशाननाचा वध करून श्रीरामाने रामराज्य स्थापन केले. असे म्हणतात, की रावणाचा वध झाला नसता तर कायमचा सूर्यास्त झाला असता.

परंतु तसे झाले नाही, तरी विजयाचा सूर्य उगवला आणि तो तेजाने चमकत राहिला. रावण





दहन लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आकर्षित करते. यंदा लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवाराच्या वतीने भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांगवीच्या PWD मैदानावर दसऱ्या निमित्ताने महिलांच्या करीता महाभोंडला आणि रावण दहन शनिवार, 12 ऑक्टोबर 2024 रोजी सायंकाळी 6 वाजेपासून साजरा केला जाणार आहे. यावेळी ६१ फुटी रावणाचे 'दहन' यावेळी करण्यात येणार आहे. महिलांच्या बालपणातील स्मृतींना उजाळा मिळावा, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून महाभोंडला खेळाचे आयोजन करण्यात आले आहे.

### नाव नोंदणी करण्याचे आवाहन...

PWD मैदानात या रावणाला पाहण्यासाठी आणि त्याच्याबरोबर सेल्फी काढण्यासाठी लहान मुलांनी गर्दी केल्याचे पहायला मिळत असून या विशेष दिवशी बाहेर जाऊन उत्सवाचा आनंद घेण्याची संधी शंकर जगताप यांच्या वतीने पिंपरी चिंचवडकरांना आहे. दसऱ्याच्या उत्सवाचा आनंद घेता येईल. तुम्हीही तुमच्या कुटुंबासोबत, मित्रपरिवारासोबत नक्की भेट देऊ शकता. शहरातील भगिनींना महाभोंडला मध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या ग्रुप चे नाव भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या कृष्णा चौक, नवी सांगवी येथील कार्यालयात आणि याhttp://99605 01888 मोबाईल नंबर वर नाव नोंदणी करण्याचे आवाहन लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.




लोकनेते आमदार
लक्ष्मणभाऊ जगताप
मित्र परिवार
आयोजित
विजयादशमी
-निमित्त-
महिलांसाठी
महाभोंडला व रावणदहन
शनिवार, दि. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वा.
स्थळ: पी.डब्ल्यू डी. मैदान, सांगवी, पिंपरी चिंचवड, पुणे- ४११०२७.
विशेष आकर्षण
- SOUND BY -
RANE BROTHER'S
- LIGHTS BY -
SAI LIGHTS
प्रमुख उपस्थिती: फेम- चांडाळ चौकटीच्या करामती
श्री.रामभाऊ जगताप (रामभाऊ)
श्री.भरत शिंदे (बाळासाहेब)
श्री.सुभाष मदने (सुभाषराव)
निमंत्रक
जगताप शंकर पांडुरंग
(बी.कॉम.एम.बी.ए.)
शहराध्यक्ष
भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)




# तरुणाई ऑनलाइन गेमिंगच्या विळख्यात?

**गेल्या काही दिवसांपासून समाज माध्यमांवर हिमांशू मिश्रा या जेईई परीक्षा चांगल्या गुणांनी पास झालेल्या तरुणाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यामागचं कारणही तसंच आहे. ऑनलाईन गेमच्या इतक्या आहारी गेला होता की वयाच्या २२ व्या वर्षी त्याच्यावर ९६ लाखांपेक्षा जास्त कर्ज झालं. त्याच्या या ऑनलाईन गेमच्या व्यसनापायी त्याच्या घरच्यांनी त्याच्याशी नातं तोडून टाकलं.**

त्याच्या वडिलांचं निधन झालं तर त्याला वडिलांचं अंत्यदर्शनही घेता आलं नाही. त्याच्या आईने त्याच्या या गोष्टीला कंटाळून त्याच्याशी आपलं कसलंही नातं नाही, असं जाहीर केलं आहे. 'मी रस्त्यावर मरून पडलो तरी घरचे मला बघायला येणार नाहीत' असंदेखील तो म्हणत आहे. हिमांशूच्या प्रकरणावरून नेटिझन्समध्ये दोन गट पडले आहेत. एका गटाचे म्हणणे आहे की हिमांशू खोटंनाटं सांगून सहानुभूती मिळवून लोकांकडून पैसे उकळतो. तर काहीजण त्याच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत आहेत. पण हे प्रकरण खोटं असो किंवा खरं, पण हा व्हिडिओ व्हायरल झाला त्याखाली ज्या अनेक टिप्पण्या होत्या, त्या जास्त महत्त्वाच्या आहेत. कारण त्यात आपणही अशा पद्धतीने ऑनलाइन गेमिंगमधून पैसे हरल्याचे उल्लेख होते. माझे ८० हजार गेले, १२ लाख गेले, १५ लाखांना डुबलो आहे,




असं तिथं लोकानी सांगितलं आहे. यावरून हे समजतं की हिमांशूचं प्रकरण खोटं असो वा खरं पण ऑनलाईन गेमिंग, गॅम्बलिंगच्या आहारी जाऊन बरीच तरुणाई फसली चालली आहे.आज सगळ्यांकडे मोबाईल आणि इंटरनेट असतं. त्यात या ऑनलाईन गेमिंग, गॅम्बलिंगच्या जाहिरातीही झळकतात. त्या जाहिरातींमधून एखाद्या सेलिब्रिटीचा चेहरा दाखवला जातो आणि ते म्हणतात की मी ५० रु, १०० रु लावले आणि ५० हजार जिंकले, १ लाख जिंकले, १० लाख जिंकले. काही जाहिरातींमध्ये हा आकडा यापेक्षाही मोठा दाखवला जातो. म्हणजे मी सुरुवातीला १०० रु. ने खेळलो आणि एक कोटी जिंकले. तरुण पिढी अशा जाहिरातींकडे साहजिकच आकर्षली जाते. हल्ली समाज माध्यमांवरचे इतर लोकांचे चमकूपणा करणारे रील, व्हिडिओ पाहून आपलाही असाच रुबाब असावा असा विचार तरुणांच्या मनात घोळत असतो किंवा त्याचं त्यांना आकर्षण असतं. पण पुरेसे पैसे नसल्याने ते शौक पूर्ण करता येत नाहीत. मग अशा जाहिराती पाहून कमी वेळात झटपट पैसे कमवण्याचा मोह होतो. युट्यूबवरही असे अनेक व्हिडिओज आहेत ज्यामध्ये गेमिंग चॅनल चालवणारे युट्यूबर सर्रास सांगतात की ऑनलाईन गेम खेळून मी महिन्याला इतके कमवले. त्या पैशातून लक्झरी गाडी घेतली, परदेशीच फिरलो. याची भुरळ इतर तरुणांना लगेच पडते. ते पाहून गेम डाऊनलोड करतात. किंवा कोणीतरी लिंक शेअर केली असेल तर त्या लिंकद्वारे अॅप डाऊनलोड करतात किंवा अॅप नसेल तर वेबसाईटद्वारे हे गेम खेळले जातात. यामध्ये नवीन वापरकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी सुरुवातीला त्यांच्या गेमिंग वॅलेटमध्ये काही रक्कम वेलकम बोनस म्हणून जमा केली जाते. ती तुमच्या वॅलेटमध्ये दिसते पण ती तुम्ही काढू शकत नाही. पण तिचा वापर करून तुम्ही सुरुवातीला गेम खेळू शकता. खेळायला सुरुवात केल्यावर तुम्ही सतत जिंकत नाही. कधी ना कधी हरताच. हरणारा विचार करतो की जाऊ दे, कुठे माझे पैसे होते... गेले तर गेले. आता एकदा माझे पैसे लावून खेळतो. मग त्यात एखादा गेम जिंकला की त्याच्या मनात आणखी पैसे जिंकायची लालूच निर्माण होते. मग तरुण आणखी पैसे लावून गेम खेळू लागतात. हळूहळू त्याची सवय होऊन जाते.मग एखादा गेम, बेटिंग हरल्यावर ते पैसे वसूल करण्यासाठी पुन्हा पुन्हा पैसे लावून गेम खेळू लागतात. आणि इथेच ते त्या ऑनलाईन गेममध्ये गुरफटून जायला लागतात. एखादा दिवस खेळलं नाही तर ते सैरभैर होतात, सतत त्यांची चिडचिड होऊ लागते. आणि स्वत: जवळचे पैसे संपले तर घरातून पैसे मागायचे, नाही मिळाले तर बाहेरून उसने घ्यायचे वगैरे प्रकार सुरू होतात. पुढे हे इतके जास्त होते की झटपट श्रीमंत होण्याच्या नादात डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा राहतो. पण आपली चूक कळेपर्यंत उशीर झालेला असतो. मग मानसिक तणाव येतो.

## प्रासंगिक »

### ओढ 'बॅलट'ची?

***जम्मू-काश्मीरमध्ये आता ९० सदस्यांची विधानसभा भरेल आणि लोकनियुक्त सरकारही त्या प्रांतास मिळेल; तेव्हा केंद्राने आपली लुडबूड थांबवणे इष्ट..***

देशबांधवांकडून होणारी उपेक्षा, धर्म या योगायोगामुळे सतत घेतला जाणारा संशय, 'कडे-कडे'ने जगणे नशिबी आल्याने निष्ठांबाबत निर्माण केले जाणारे प्रश्न या आणि अशा अन्य अनेक मुद्द्यांवरील नकारात्मकता आणि नैराश्य बाजूस सारत जम्मू-काश्मिरातील नागरिकांनी भरघोस मतदान केले ही हरखून जावे अशी बाब. त्या राज्यांतील मतदारांस आपल्या लोकशाही निष्ठा व्यक्त करण्याची ही संधी मिळाली याचे श्रेय सर्वोच्च न्यायालयाचे. मतदान शांततेत पार पाडल्यावर विजयी खुणा आणि मुद्रेद्वारे निवडणूक आयोग भले आपले 'यश' साजरे करत असेल. पण त्यास यासाठी भरीस घातले सर्वोच्च न्यायालयाने. धरते तर या राज्यांतील नागरिकांस अजूनही त्यापासून वंचित राहावे लागते. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानून या निवडणुकीचे महत्त्व इतके का हे लक्षात घ्यायला हवे.

आपल्याकडे एखाद्या विषयाची माहिती, वर्णन, मांडणी बहुदा एकांगी असते. ती कोण देते/ करते आहे यावर बरेच अवलंबून असते. असे अनेक विषय आहेत. त्यापैकी महत्वाचे दोन विषय म्हणजे गाव आणि शेतकरी समुदाय. या दोन्हीविषयी साहित्य, सिनेमा यामध्ये जे चित्र रंगविले जाते.

# गाव बदलत आहे... प्रश्न बदलाच्या दिशेचा

त्याचा अनुभव संबधितांना 'आपला' वाटत नाही आणि जे संबधित नसतात त्यांना त्यातून मनोरंजनाशिवाय इतर काही तपशील मिळत नाहीत. सैराट नावाचा चित्रपट प्रसिद्ध झाला आणि त्यानंतर त्यामध्ये बोलली गेलेली भाषा, पुढे अनेक टीव्ही मालिकांमधून किमान एक पात्र त्या ढंगाची भाषा बोलताना दिसू लागले दुसरीकडे खेड्यात तशी भाषा बोलणारे कमी होत आहेत. वीस पंचवीस वर्षांपूर्वी शेतकरी नवरा-बायको हेच खरे रोमॅन्टिक जीवन जगत आहे असा भास होणारे चित्रपट, गाणी तयार होत होती. पुढे शेतकरी शेती करतो म्हणजे जणू काही त्याची अधोगतीच सुरू असल्याचा भास व्हावा असे चित्र रेखाटले गेले. त्याचप्रमाणे गावाचे सुद्धा चित्र रेखाटले जाते. जगातली सर्व भोळी भाबडी, माणुसकी असणारी माणसे गावात राहतात, गावकरी बेरकी असतात, गावचा पाटील सरपंच हा बाहेरख्याली असतो, पुढे तो भ्रष्टाचारी दाखविला जात असे. यावर अशी मांडणी करणाऱ्याचा दावा असा



असतो की, आम्ही खेड्यांतून,शेतकरी कुटुंबातून आलो आहोत. त्यामुळे आम्हाला हे काही शिकायची गरज नसते. आम्ही हे अनुभवले आहे. त्यामुळे इतरांना त्याविषयी काही अधिकार असता कामा नये.मागे एकदा शेती संशोधन सादरीकरणावेळी आलेला अनुभव नमूद करण्यासारखा आहे. शेती पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण झाल्या नंतरचे सादरीकरण होते. त्या समितिमध्ये एक पुण्याच्या सदाशिव पेठेत जन्म झालेले आणि पुढे सांख्यिकी या विषयाचे प्राध्यापक सदस्य म्हणून उपस्थित होते. ते त्यांच्या विषयाच्या अनुषंगाने काही सूचना, बदल सुचवत होते. काही वेळा अनुमान चुकीचे ठरवत होते. विषय अंगलट येत आहे असे कळाल्या नंतर इतर प्राध्यापकानी त्यांचे "नाव" घेऊन त्यांना असे सुनावले की आपल्याला भुईमुगाला शेंगा कुठे लागतात हे माहीत आहे का? त्या प्रश्नावर त्यांची खिल्ली उडवायला सुरुवात केली. त्यावर ते उत्तरले माझा तो विषय नाही. मी, जो तपशील दिला आहे आणि त्याचे जे पृथ:करण केले आहे याविषयी बोलतो आहे. त्यांचे कोणी ऐकण्याच्या मनस्थिती नव्हते. त्यामुळे त्यांच्या सूचनांचे काय झाले असेल याचा अंदाज येतोच. अशा पद्धतीने विषयाला बगल दिली जाते. मागे एकदा रोजगार हमीमध्ये खूप मोठे काम उभे करणाऱ्या एका कार्यकर्तीला मी गमतीने सूचना केली होती की आपण केवळ आडनाव बदलले तर आपण जे सांगत आहात हे आपले अनुभव आहेत असे लोकांना वाटेल आणि ते आपल्या कार्य-अभ्यासापेक्षा जास्त प्रभावी ठरेल. अशी भूमिका ठेवून त्याची मांडणीसाठी 'अनुभव' ही पूर्वअट ठेवण्याचा खूप मोठा विपरीत परिणाम असा होतो की अभ्यासक म्हणून जे अभ्यास करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सयाजी शिंदे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत!

## गेल्या 10 वर्षांपासून मी सामाजिक क्षेत्रात : सयाजी शिंदे

। बारामती ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. पुढील काही दिवसांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांचे नेते जोरदार कामाला लागले आहेत. अनेक नेत्यांकडून मतदारसंघात मोर्चेबांधणी सुरु असून सभा, मेळावे घेण्यात येत आहेत. यातच ऐन निवडणुकीच्या तोंडावर अनेक नेते, एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. असे असतानाच आता अभिनेते सयाजी शिंदे यांनी आज (११ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे.**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज मुंबईत पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत अभिनेते सयाजी शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. अभिनेते सयाजी शिंदे हे आता पक्षाचे स्टार प्रचारक म्हणून काम करणार आहेत.अभिनेते सयाजी शिंदे यांनी हिंदी, मराठी तेलगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. तसेच ते गेल्या काही वर्षांपासून सामाजिक क्षेत्रातही कार्यरत होते. सयाजी शिंदे यांनी लाखो झाडे लावत सह्याद्री देवराई उभे केलेलं आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची राज्यभरात चर्चाही झाली. मात्र, सामाजिक कार्यानंतर आता सयाजी शिंदे यांनी राजकारणात प्रवेश करत अजित पवारांच्या उपस्थितीत घड्याळ हाती बांधलं आहे. ज्येष्ठ अभिनेते श्री. सयाजी शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा कार्यक्रम संपन्न झाला. मी श्री. सयाजी शिंदे यांचं मनापासून स्वागत करतो. मनोरंजन सृष्टीसह सामाजिक आणि पर्यावरण क्षेत्रात त्यांनी बजावलेली भूमिका अतुलनीय आहे. त्यांच्या प्रवेशानं पक्षाला अधिक बळकटी येईल... या पक्ष प्रवेशावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी अभिनेते सयाजी शिंदे यांचं कौतुक केलं. भुजबळ म्हणाले, "आता उद्या दसरा आहे. पण आम्हाला आजच दसरा साजरा करण्याचं भाग्य लाभलं. खरं तर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सयाजी शिंदे यांनी आपल्या कामाने मोठा ठसा उमटवला आहे. त्यांनी मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य अशा विविध भाषेच्या चित्रपटांमध्ये अभिनय केला. ते अभिनेते आहेतच, पण आता ते नेते देखील झाले आहेत. सयाजी शिंदे यांनी सामाजिक क्षेत्रात मोठं काम केलं आहे. राज्यात ठिकठिकाणी वृक्षारोपण त्यांच्या माध्यमातून करण्यात आलेलं आहे", असं म्हणत मंत्री छगन भुजबळ यांनी सयाजी शिंदे यांचं कौतुक केलं.अभिनेते सयाजी शिंदे यांनी आज (११ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे. सयाजी शिंदे यांनी हिंदी, मराठी तेलगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. तसेच ते गेल्या काही वर्षांपासून सामाजिक क्षेत्रातही कार्यरत आहेत. सयाजी शिंदे यांनी लाखो झाडे लावत सह्याद्री देवराई उभं केलं. त्यांच्या या सामाजिक कार्याची राज्यभरात चर्चाही झाली. मात्र, सामाजिक कार्यानंतर आता सयाजी शिंदे यांनी राजकारणात प्रवेश केला. मात्र, सयाजी शिंदे यांनी राजकारणात प्रवेश करताना अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच प्रवेश का केला? याबाबत सयाजी शिंदे यांनी भाष्य केलं आहे. "मला या पक्षाच्या (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट) काही स्ट्रॅटेजी आणि विचार आवडले, म्हणून प्रवेश केला", असं सयाजी शिंदे यांनी सांगितलं."मी अजून नेता झालेलो नाही. त्यामुळे मला अजून एवढं बोलता येत नाही. मी चित्रपटात नेत्यांच्या, गृहमंत्र्यांच्या भूमिका केलेल्या आहेत. खलनायकाच्याही भूमिका केल्या. मी राजकारणात कधी येईल, असं मला वाटलंच नव्हतं. गेल्या १० वर्षांपासून मी सामाजिक क्षेत्रात काम करत आहे. या कामाची सुरुवात माझ्या आईमुळे झाली होती. मी ठरवलं होतं की, माझ्या आईच्या वजनाएवढ्या झाडाच्या बिया लावेन आणि पर्यावरणाचं चांगलं काम करेन. हे काम करत असताना काही अडचणी आल्या की मंत्रालयात जावं लागायचं. समजा मी जर २५ वेळा मंत्रालयात गेलो असेल तर त्यापैकी १५ वेळा अजित पवारांना भेटलो. ज्या-ज्या वेळी मी अजित पवारांना भेटलो तेव्हा एक घाव दोन तुकड्यासारखं काम त्यांनी केलं.

### सयाजी शिंदे काय म्हणाले?

ते लगेच तातडीने निर्णय घेतात. त्यामुळे मला देखील खूप फायदा झाला. त्यांना भेटल्यामुळे पटकन कामे झाली. त्यामुळे मला त्यांच्याबाबत कायम आदर आहे", असं सयाजी शिंदे यांनी म्हटलं."मागील ८ दिवसांत अचानक ठरलं की राजकारणात गेलं तर काय होईल? मग मला वाटलं की बाहेर राहून बरेच प्रश्न बोलण्यापेक्षा सिस्टममध्ये जाऊन बोललं पाहिजे. प्रश्न सोडवले पाहिजेत. मग जर अजित पवारांसारखा माणूस असेल तर काय? राष्ट्रवादी काँग्रेस असेल तर काय? मग मला वाटलं की का नाही?

# नवनीत राणा यांना सामूहिक अत्याचाराची धमकी

## 10 कोटी रुपये द्या अन्यथा मी तुमच्या घरासमोर गाय कापेन

। अमरावती ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माजी खासदार आणि भाजपा नेत्या नवनीत राणा यांना पत्राद्वारे सामूहिक अत्याचाराची धमकी देण्यात आली आहे. हे पत्र स्पीड पोस्टद्वारे त्यांच्या अमरावती येथील घरी प्राप्त झालं आहे. नवनीत राणा यांना मिळालेल्या धमकीच्या पत्रामुळे आता खळबळ उडाली आहे. तसेच या पत्रामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांनाही उधाण आलं आहे.राणा यांचे स्वीय साहायक विनोद गुहे यांनी आज माध्यमांशी बोलताना माहिती दिली.**



"आज दुपारी आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्या अमरावतीतील निवासस्थानी एक निनावी पत्र आलं आहे. हे पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीने त्याचे नाव अमीर असल्याचे सांगितलं आहे. हैदराबादमधून त्याने हे पत्र पाठवलं असून त्याचे नातेवाईक दुबई आणि पाकिस्तानमध्ये असल्याचा उल्लेख त्याने या पत्रात केला" असल्याचे विनोद गुहे यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना, "तुम्ही हिंदूंबाबत बोलता. हे योग्य नाही. मी तुमच्यावर सामूहिक अत्याचार करेन तसेच मला १० कोटी रुपये द्या अन्यथा मी तुमच्या घरासमोर गाय कापेन, अशी धमकीही त्याने दिल्याचेही विनोद गुहे यांनी सांगितलं आहे. या पत्रासंदर्भात राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली असून याप्रकरणी तत्काळ कारवाई करून पत्र पाठवण्याऱ्या व्यक्तीला अटक करावी.

### धमकीचे पत्र हे इंग्रजी लिपीत

दरम्यान, माजी खासदार नवनीत राणा यांना पाठवलेले धमकीचे पत्र हे इंग्रजी लिपीत असून त्याचा मजकूर मात्र हिंदीमध्ये आहे. तसेच या पत्राच्या दोन्ही बाजूंनी हे पत्र लिहिण्यात आले आहे. हे पत्र ज्या पाकिटामधून पाठवण्यात आले, त्या पाकिटावर नवी दिल्ली येथील पत्त्यासह रवी राणा यांच्या शंकर नगर येथील घराचा पत्ता खाली बारीक अक्षरात इंग्रजीमध्ये लिहिला आहे.महत्त्वाचे म्हणजे माजी खासदार नवनीत राणा यांना अशाप्रकारे धमकी देण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी मार्च महिन्यात नवनीत राणा यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली होती.

# नैतिकतेच्या प्रभावाखाली येऊ नये!

## विश्वासार्हता हा घटनात्मक व्यवस्थेचा आधार : सरन्यायाधीश

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी न्यायालयात सुनावल्या जाणाऱ्या निर्णयांबाबत एक महत्त्वाचं वक्तव्य केलं. न्यायालयीन निर्णय घेताना न्यायाधीशांनी कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी याबाबत भाष्य केलं. ते म्हणाले, न्यायाधीशांनी एक गोष्ट ध्यानात ठेवावी की त्यांनी कायदेशीर निर्णय घेताना नैतिकतेच्या प्रभावाखाली येऊ नये. न्यायाधीशांनी घटनात्मक व कायदेशीर निर्णय घेताना स्वतःवर नैतिकतेचा प्रभाव पडू न देता वागणं अपेक्षित आहे.**



चंद्रचूड यांनी बुधवारी भूतानमध्ये आयोजित भूतान डिस्टिंग्विश स्पीकर्स फोरमला संबोधित केलं. यावेळी न्यायव्यवस्थेची, न्यायाधीशांची विश्वासार्हता आणि न्यायालयावरील संस्थात्मक विश्वास या मुद्द्यांवरही त्यांनी भाष्य केलं. सरन्यायाधीश म्हणाले, न्यायालयांचा संस्थात्मक विश्वास आणि त्यांची विश्वासार्हता हा समृद्ध घटनात्मक व्यवस्थेचा आधार आहे. न्यायालये लोकांचे विश्वस्त म्हणून संसाधने आपल्याकडे ठेवत नाही. न्यायालयांच्या विश्वासार्हतेसाठी लोकांचा विश्वास खूप महत्त्वाचा आहे. जो बऱ्याचदा त्यांच्या कार्यपद्धतीत जनमतापासून अलिप्त असतो. खरंतर, तशीच परिस्थिती अपेक्षित आहे. जनमतही महत्त्वाचं आहे. सर्वोच्च न्यायालय हे जनतेचं न्यायालय असल्याचा आम्हाला अभिमान आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, न्यायपालिकेने अनेकदा सरकारने केलेल्या करारांवर, नैसर्गिक संसाधानांच्या वितरणाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. राजकीय कार्यकारिणी आणि न्यायफालिकेच्या भूमिकेत फरक सांगताना सरन्यायाधीशांनी सांगितलं की, अगदी कनिष्ठ न्यायालयाच्या स्तरावरही न्यायिक अधिकारी त्यांच्या निर्णयांच्या लोकप्रियतेकडे दुर्लक्ष करून काम करतात, कायद्याची अंमलबजावणी करतात, ते त्यासाठीच प्रशिक्षित आहेत. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी केंद्र सरकारच्या व इतर राज्य सरकारांच्या कारभारावर बोट ठेवल्याचंही सरन्यायाधीशांनी यावेळी नमूद केलं. धनंजय चंद्रचूड यांनी न्यायालयांच्या कारभाराच्या पारदर्शकतेवर भर दिला. यावर बोलताना त्यांनी भारतातील जनहित याचिका या संकल्पनेचा संदर्भ दिला. हे भारतातील न्यायालयांचं प्रमुख वैशिष्ट्य असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. करोना काळात देशभर लॉकडाऊन लावलेला असताना ही प्रणाली खूप उपयोगी पडल्यांचही त्यांनी सागितलं. चंद्रचूड यांनी बुधवारी भूतानमध्ये आयोजित भूतान डिस्टिंग्विश स्पीकर्स फोरमला संबोधित केलं. यावेळी न्यायव्यवस्थेची, न्यायाधीशांची विश्वासार्हता आणि न्यायालयावरील संस्थात्मक विश्वास या मुद्द्यांवरही त्यांनी भाष्य केलं. सरन्यायाधीश म्हणाले, न्यायालयांचा संस्थात्मक विश्वास आणि त्यांची विश्वासार्हता हा समृद्ध घटनात्मक व्यवस्थेचा आधार आहे. न्यायालये लोकांचे विश्वस्त म्हणून संसाधने आपल्याकडे ठेवत नाही. न्यायालयांच्या विश्वासार्हतेसाठी लोकांचा विश्वास खूप महत्त्वाचा आहे. जो बऱ्याचदा त्यांच्या कार्यपद्धतीत जनमतापासून अलिप्त असतो. खरंतर, तशीच परिस्थिती अपेक्षित आहे. जनमतही महत्त्वाचं आहे. सर्वोच्च न्यायालय हे जनतेचं न्यायालय असल्याचा आम्हाला अभिमान आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, न्यायपालिकेने अनेकदा सरकारने केलेल्या करारांवर, नैसर्गिक संसाधानांच्या वितरणाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. राजकीय कार्यकारिणी आणि न्यायफालिकेच्या भूमिकेत फरक सांगताना सरन्यायाधीशांनी सांगितलं की, अगदी कनिष्ठ न्यायालयाच्या स्तरावरही न्यायिक अधिकारी त्यांच्या निर्णयांच्या लोकप्रियतेकडे दुर्लक्ष करून काम करतात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी केंद्र सरकारच्या व इतर राज्य सरकारांच्या कारभारावर बोट ठेवल्याचंही सरन्यायाधीशांनी यावेळी नमूद केलं. धनंजय चंद्रचूड यांनी न्यायालयांच्या कारभाराच्या पारदर्शकतेवर भर दिला.

### काँग्रेसने राज्यात 37 जागा जिंकल्या

यावर बोलताना त्यांनी भारतातील जनहित याचिका या संकल्पनेचा संदर्भ दिला. हे भारतातील न्यायालयांचं प्रमुख वैशिष्ट्य असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. करोना काळात देशभर लॉकडाऊन लावलेला असताना ही प्रणाली खूप उपयोगी पडल्यांचही त्यांनी सागितलं.घटनात्मक व्यवस्थेचा आधार आहे. न्यायालये लोकांचे विश्वस्त म्हणून संसाधने आपल्याकडे ठेवत नाही. न्यायालयांच्या विश्वासार्हतेसाठी लोकांचा विश्वास खूप महत्त्वाचा आहे. जो बऱ्याचदा त्यांच्या कार्यपद्धतीत जनमतापासून अलिप्त असतो. खरंतर, तशीच परिस्थिती अपेक्षित आहे. जनमतही महत्त्वाचं आहे. सर्वोच्च न्यायालय हे जनतेचं न्यायालय असल्याचा आम्हाला अभिमान आहे.

# टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी नोएल टाटा

## राष्ट्र उभारणीत स्वतःला पुन्हा समर्पित करतो : नोएल टाटा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या उद्योगजगताचा चेहरा असलेले, परोपकारी उद्योगपती आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांचे दि. 9 ऑक्टोबर रोजी निधन झाले. अख्खा देश शोकाकुल झाला होता. त्यांचे दातृत्व आणि समाजसेवा ही सदैव प्रेरणादायी ठरणार आहे. रतन टाटा अध्यक्ष असलेल्या टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी त्यांचे सावत्र बंधु नोएल टाटा यांची आज दि. 11 ऑक्टोबर रोजी निवड करण्यात आली.**

आज मुंबईमध्ये टाटा ट्रस्टचा समावेश असलेल्या विविध ट्रस्टच्या विश्वस्तांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन एन टाटा यांच्या निधना शोक व्यक्त करण्यात आला त्यावेळी त्यांनी केवळ टाटा समूहासाठीच नव्हे, तर त्यांनी केलेल्या सेवांचे स्मरण केले गेले. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून नोएल नवल टाटा यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यांची नियुक्ती तात्काळ लागू झाली आहे. दिवंगत रतन टाटा यांनी लग्न केले नसल्याने त्यांना वारस नव्हता तसेच त्यांनी टाटा ट्रस्टमध्ये उत्तराधिकारी



कोण असणार याचे नावही दिले नव्हते. नोएल यांची नियुक्ती महत्त्वाची आहे कारण टाटा ट्रस्टकडे टाटा सन्सची तब्बल 66% मालकी आहे, टाटा ब्रँड अंतर्गत विविध कंपन्यांची होल्डिंग ही 150 वर्षांहून अधिक जुनी आहे. माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीमुळे मी अत्यंत सन्मानित आणि नम्र आहे. रतन टाटा आणि टाटा समूहाच्या संस्थापकांचा वारसा पुढे नेण्यास मी उत्सुक आहे. एक शतकापूर्वी स्थापन झालेली टाटा ट्रस्ट ही सामाजिक हिताचे काम करण्यासाठी एक अद्वितीय साधन आहे. आमच्या विकासात्मक आणि परोपकारी उपक्रमांना पुढे नेण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत आमची भूमिका निभावण्यासाठी स्वतःला पुन्हा समर्पित करतो, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून त्यांच्या नियुक्तीबद्दल सांगितले. आपल्या पहिल्याच संबोधनात राष्ट्रहिताची बात करत नोएल टाटा यांनी टाटांचा आणि रतन टाटांचा वारसा पुढे नेण्याचा दृष्टीकोन समोर ठेवला.

### नोएल टाटा यांच्याविषयी

नोएल टाटा हे 67 वर्षांचे आहेत. ते दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्टमध्ये विश्वस्त आहेत. नोएल टाटा हे ट्रेंट लिमिटेड आणि टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशचे अध्यक्ष आहेत. तसेच ते टाटा इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक असून टाटा स्टील आणि टायटन कंपनीचे उपाध्यक्ष आहेत .नोएल यांचे शिक्षण युकेच्या ससेक्स विद्यापिठातून पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे लग्न टाटा सन्समधील मोठे भागधारक असलेल्या पालोनजी मिस्त्री यांची कन्या आलू मिस्त्री यांच्याशी झाले आहे.

# सांस्कृतिक परंपरेचा खजिना म्हणजे दसरा..!

**हिंदूंचा एक प्रमुख सण आणि शुभ दिवस. आश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी किंवा दसरा म्हणतात. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत देवीचे नवरात्र असते. याची समाप्ती या दिवशी होते. शुंभ, निशुंभ, रक्तबीज, महिषासूर या राक्षसांना मारण्यासाठी दुर्गेने चंडीचा अवतार घेतला आणि नऊ दिवस या राक्षसांबरोबर युद्ध केले.**

दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' असं म्हणत विजयादशमीचा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्राचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा. ९ दिवस अधिष्ठान केलेल्या देवीने महिषासूर राक्षसाचा या दिवशी वध केला, असे म्हटले जाते. तसेच रामानेही याच दिवशी रावणाचा वध केल्याने या सणाला विजयादशमी असेही म्हटले जाते. रावणाचे दहन म्हणजेच वाईट वृत्तींचे दहन या दिवशी करावे, असे मानले जाते. या दिवशी घरोघरी पूजा-अर्चा करुन शस्त्रांची, लक्ष्मीची आणि घरातील वाहनांची मनोभावे पूजा केली जाते. झेंडूची फुले आणि आंब्याची पाने यांना आजच्या दिवशी विशेष महत्त्व आहे. दाराला झेंडूच्या फुलांचे तोरण बांधले जाते. तसेच आपट्याची पाने सोने म्हणून लुटणे ही पूर्वांपार चालत आलेली परंपरा आहे. वाचकहो, एकमेकांना ही आपट्याची पाने देऊन तुमच्या कुटुंबात भरभराट होवो. आपण आमच्यासाठी लाख मोलाचे आहात. म्हणून 'सोनं घ्या आणि सोन्यासारखे राहा'! दसऱ्याच्या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून जाण्याची प्रथा प्रचलित आहे . लोक या दिवशी परस्परांनासोने म्हणून आपट्याची पाने देतात. सायंकाळी गावाची सीमा ओलांडून ईशान्येस जायचे, शमीच्या किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करायची, तेथे अष्टदल रेखाटून त्यावर अपराजिता देवीची स्थापना करावयाची आणि तिला प्रार्थना करावयाची की, मला विजयी कर. त्यानंतर योद्ध्यांनी शस्त्र पूजन, व्यापाऱ्यांनी व्यापारासाठी प्रयाण व विद्यार्थ्यांनी सरस्वतीपूजन करायचे अशी प्रथा होती. मुले पाटीवर सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून त्या पाटीची पूजा करतात. पुस्तकांची आणि वह्यांचीही पूजा होते. दशमीला महिषासुराचा तिने वध करून अंतिम विजय संपादन केला, म्हणून या दिवशी आनंदोत्सव साजरा करतात. आश्विन शुद्ध दशमीच्या दिवशी आकाशात तारका दिसू लागताच विजय नावाचा मुहूर्त असतो व त्यावेळी जे काम हाती घ्यावे त्यात यश मिळते, असे पुराणात सांगितले आहे. चैत्र पाडवा (चैत्र शुद्ध प्रतिपदा), अक्षय्य तृतीया (वैशाख शुद्ध तृतीया), विजयादशमी व दिवाळीचा पाडवा (कार्तिक शुद्ध प्रतिपदा, अर्धा मुहूर्त) या हिंदूंच्या साडेतीन विशेष शुभ मुहूर्तातील हा एक आहे. विजयादशमीला 'दसरा' असे म्हटले जाते. याच दिवशी रामाने रावणाचा वधही केला होता असे म्हणतात. रावणाचे दहन केले म्हणूनच वाईट वृत्तींचे दहन या दिवशी करावे असे मानले जाते. दसऱ्याच्या दिवसाला सीमोल्लंघन म्हणूनही ओळखले जाते. कारण अनेक शूर, पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राज्यावर स्वारी करण्यास जात असत, त्याला सीमोल्लंघन म्हणत. म्हणून हा दिवस सीमोल्लंघन म्हणून ओळखला जातो. आपल्या गावाची वेस ओलांडून जाणे याचा अर्थ सीमेचे उल्लंघन करणे. या दिवशी शमी किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करतात. शमी वृक्षाजवळच भूमीवर अपराजिता देवीची मूर्ती रेखाटून तिचीही पूजा करतात. रावणाचा वध करण्यासाठी रामाने याच दिवशी शमीचे पूजन करून प्रस्थान ठेवले. अर्जुनाने अज्ञातवास संपवून याच दिवशी शमीचे पूजन केले व आपली शस्त्रे पुन्हा हातात घेतली. पुर्वीच्या काळी दसऱ्याच्या दिवशी विजयोत्सव असल्याने राजे महाराजे आपल्या घोड्यांना सुशोभित अलंकार घालत असतं नंतर निराजन नावाचा विधी करत, शस्त्रास्त्रांचे पूजन करत आणि मग पुढच्या लढाईत विजय मिळवण्यासाठी प्रस्थान करत असे सांगितले जाते. कौत्सासाने चौदा कोटी सुवर्णमुद्रा देण्यासाठी रघुराजाने कुबेरावर स्वारी केली. त्यामुळे भयग्रस्त होऊन कुबेराने दसऱ्याच्या दिवशी शमीच्या झाडावर सुवर्णवृष्टी केली. आवश्यक तेवढे सोने रघुराजाने कौत्सास देऊन बाकीचे त्याने नागरिकांना वाटले अशी कथा स्कंदपुराणात आहे. या दिवशी सोने लुटण्याच्या प्रथेचा संबंध याच कथेशी आहे. साधारणपणे त्रेतायुगापासुन साजरा केला जाणारा विजयादशमी म्हणजेच दसरा हा सण असून, या सणाला हिंदू धर्मामध्ये अनन्य साधारण महत्त्व आहे. आश्विन शुद्ध दशमी म्हणजेच विजयादशमी. असे म्हणतात की, याच दिवशी भगवान रामाचा पूर्वज रघू या आयोध्याधीश राजाने विश्वजित यज्ञ केला होता. त्या काळापासून म्हणजे त्रेतायुगापासून हिंदू लोक विजयादशमी महोत्सव साजरा करतात. दसऱ्याला शमी वृक्ष पूजनाला विशेष महत्त्व आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसात प्रत्येक दिवशी संध्याकाळी शमी वृक्षपूजन केल्याने आरोग्य व धन संपत्ती प्राप्त होते अशी मान्यता आहे. या वृक्षाला अश्मंतक असेही म्हणतात. आपट्याची पाने पित्त व कफ दोषांवर गुणकारी आहेत. विजयादशमीला आपट्यांची पाने एकमेकांना दिली जातात. यालाच सोने लुटणे असेही म्हणतात.



'दसरा' हा प्रारंभी एक कृषीविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावेळी शेतकरी हा उत्सव साजरा करत असत. विजयादशमीला शस्त्र आणि शास्त्र पूजन करण्याविषयी वेगवेगळे महत्त्व आहे. प्राचीन काळापासून क्षत्रिय युद्धाला जाण्यासाठी या दसरा या दिवसाची निवड करत होते. त्यांचे मानणे असे होते की, दसर्यासच्या दिवशी केलेल्या युद्धात निश्चितच विजय मिळतो. क्षत्रियांप्रमाणे ब्राह्मण लोकही दसरा या दिवशी विद्या ग्रहण करण्यासाठी घराबाहेर पडत. तसेच व्यापारी लोक विजयादशमीच्या या पवित्र दिवशी नवीन दुकान, शोरूम इत्यादींचा शुभारंभ करणे शुभ मानतात. नवरात्र स्पेशल घरच्या घरी तयार करा बीटाचा हलवा नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या ताटात नऊ धान्यांची पेरणी करतात व दसर्याेच्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथादेखील या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. पुढे याच सणाला धार्मिक स्वरूप दिले गेले आणि इतिहासकाळात तो एक राजकीय स्वरूपाचा सण ठरला.

# ऑस्ट्रेलियाने वाढवली डोकेदुखी!

## टीम इंडिया सध्या अ गटातील गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**महिला टी-२० विश्वचषक २०२४ मधील १४ वा सामना ऑस्ट्रेलिया महिला संघ आणि पाकिस्तान महिला संघ यांच्यात खेळला गेला. ऑस्ट्रेलियन महिला संघाने हा सामना ९ विकेट्सनी एकतर्फी जिंकला. या सामन्यातील ऑस्ट्रेलियाच्या विजयाने टीम इंडियाचे टेन्शन वाढले आहे. टीम इंडियाला आता उपांत्य फेरी गाठण्यासाठी आणखी मेहनत करावी लागणार आहे. भारतासाठी उपांत्य फेरीचा आणखी खडतर झाला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संघ ८९ धावांवर गारद झाला होता. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने एक विकेट गमावून ११ व्या षटकात सलग तिसऱ्या विजयावर शिक्कामोर्तब केला.**

टीम इंडिया सध्या अ गटातील गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. ग्रुप स्टेज संपल्यानंतर अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित करतील. अशा स्थितीत भारताला आपले स्थान कायम राखावे लागेल. ऑस्ट्रेलियन संघ पहिल्या स्थानावर आहे.







टीम इंडियाला आपला शेवटचा गट सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायचा आहे. या सामन्यात टीम इंडियाला विजय मिळवावा लागेल. याशिवाय नेट रन रेटही चांगला ठेवावा लागेल. तरच भारतीय संघ सहज उपांत्य फेरी गाठू शकेल. जरी भारताने आपला शेवटचा गट सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध हरला, तरी भारतीय संघाला उपांत्य फेरी गाठण्याची संधी असेल. भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्यानंतर न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यातही सामना होणार आहे. या सामन्याचा निकालही भारतीय संघासाठी खूप महत्त्वाचा असेल. जर किवी संघाने हा सामना जिंकला आणि त्यानंतर श्रीलंकेलाही पराभूत केले, तर भारताच्या अडचणींमध्ये लक्षणीय वाढ होईल. कारण भारताला त्यानंतर उपांत्य फेरी गाठता येणार नाही. त्यामुळे भारताला उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी न्यूझीलंडने दोनपैकी एक सामना पराभूत होणे अपेक्षित आहे. याशिवाय त्यांचा नेट रन रेटही भारतापेक्षा खराब असावा लागेल.श्रीलंकेचा संघ आधीच उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. लंकेने तिन्ही सामने गमावल्यामुळे ते गट-अ मध्ये तळाच्या स्थानावर आहे.

मात्र, श्रीलंकेला भारताला मदत करण्याची संधी आहे. लंकेने आपल्या शेवटच्या गट टप्प्यातील सामन्यात न्यूझीलंडचा पराभव केला तर भारताच्या पुढील फेरीत जाण्याच्या आशांना थोडे बळ मिळेल. मात्र, असे असतानाही न्यूझीलंडला त्यांच्या शेवटच्या सामन्यात पाकिस्तानचा पराभव करून उपांत्य फेरी गाठण्याची संधी असेल. ऑस्ट्रेलियन संघ पहिल्या स्थानावर आहे. टीम इंडियाला आपला शेवटचा गट सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायचा आहे. या सामन्यात टीम इंडियाला विजय मिळवावा लागेल.

### श्रीलंका शर्यतीतून बाहेर

प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने एक विकेट गमावून ११ व्या षटकात सलग तिसऱ्या विजयावर शिक्कामोर्तब केला.टीम इंडिया सध्या अ गटातील गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. ग्रुप स्टेज संपल्यानंतर अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित करतील. अशा स्थितीत भारताला आपले स्थान कायम राखावे लागेल. ऑस्ट्रेलियन संघ पहिल्या स्थानावर आहे. टीम इंडियाला आपला शेवटचा गट सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायचा आहे. या सामन्यात टीम इंडियाला विजय मिळवावा लागेल. याशिवाय नेट रन रेटही चांगला ठेवावा लागेल. तरच भारतीय संघ सहज उपांत्य फेरी गाठू शकेल.

याशिवाय नेट रन रेटही चांगला ठेवावा लागेल. तरच भारतीय संघ सहज उपांत्य फेरी गाठू शकेल. जरी भारताने आपला शेवटचा गट सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध हरला, तरी भारतीय संघाला उपांत्य फेरी गाठण्याची संधी असेल. भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्यानंतर न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यातही सामना होणार आहे. या सामन्याचा निकालही भारतीय संघासाठी खूप महत्त्वाचा असेल. जर किवी संघाने हा सामना जिंकला आणि त्यानंतर श्रीलंकेलाही पराभूत केले, तर भारताच्या अडचणींमध्ये लक्षणीय वाढ होईल. कारण भारताला त्यानंतर उपांत्य फेरी गाठता येणार नाही. त्यामुळे भारताला उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी न्यूझीलंडने दोनपैकी एक सामना पराभूत होणे अपेक्षित आहे. महिला टी-२० विश्वचषक २०२४ मधील १४ वा सामना ऑस्ट्रेलिया महिला संघ आणि पाकिस्तान महिला संघ यांच्यात खेळला गेला. ऑस्ट्रेलियन महिला संघाने हा सामना ९ विकेट्सनी एकतर्फी जिंकला. या सामन्यातील ऑस्ट्रेलियाच्या विजयाने टीम इंडियाचे टेन्शन वाढले आहे. टीम इंडियाला आता उपांत्य फेरी गाठण्यासाठी आणखी मेहनत करावी लागणार आहे. भारतासाठी उपांत्य फेरीचा आणखी खडतर झाला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संघ ८९ धावांवर गारद झाला होता.

# मनू भाकेरच्या रॅम्प वॉकने जिंकली चाहत्यांची मनं

## भाकेरचा रॅम्प वॉकचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनू भाकेरला खेळाच्या मैदानावर झेंडा गाडताना आणि व्यासपीठावर पदक घेताना तुम्ही पाहिले असेलच, पण भारताची ही स्टार नेमबाज आता मॉडेलिंगमध्ये उतरली आहे. नेमबाजीत आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेणारी मनू भाकेर आता रॅम्प वॉकमध्ये मॉडेल्स मागे टाकताना दिसत आहे. रॅम्प वॉक करून सर्वांची मने जिंकली आहेत. तिच्या रॅम्प वॉकचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**







आपली ताकद दाखवणाऱ्या मनू भाकेरने मॉडेलिंगमध्येही चमक दाखवली आहे. वास्तविक मनू भाकेर शुक्रवारी ११ ऑक्टोबर रोजी दिल्लीत एका फॅशन शोमध्ये सहभागी झाली होती. यादरम्यान मनू भाकेर रॅम्प वॉक करताना दिसली, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रॅम्प वॉक करताना मनू भाकेर किलर लूकमध्ये दिसत आहे, जे पाहून तुम्हीही थक्क व्हाल. मनू भाकेरने काळ्या रंगाचा आकर्षक ड्रेस परिधान केला आहे, जो लोकांना आकर्षित करत आहे. तिने ड्रेसवर

### ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक कामगिरी

त्याचबरोबर सोशल मीडिया वापरकर्ते सतत कमेंट करून आपली प्रतिक्रिया देत आहेत.वास्तविक मनू भाकेरने २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली होती. या २२ वर्षीय नेमबाजाने ऑलिम्पिकमध्ये दोन कांस्यपदके जिंकली होती आणि असे करणारी ती स्वतंत्र भारतातील पहिली आणि एकमेव खेळाडू आहे. मनूने १० मीटर एअर पिस्तूल आणि १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

ग्रीन जॅकेट घातले आहे, जे तिच्या लुकमध्ये आणखी भर घालत आहे. मनू भाकेरचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये मनू भाकेर खूपच सुंदर दिसत आहे. फॅशन वीकमध्ये मनू भाकेरच्या सौंदर्याने आणि शैलीने प्रेक्षकांची मने जिंकली. या फॅशन शोमध्ये मनू भाकेर सुंदर आणि आधुनिक आउटफिट्समध्ये दिसली. जे खास या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आले होते.रॅम्प वॉकबद्दल आपली प्रतिक्रिया दिली. मनु भाकेर म्हणाली की, हा अनुभव खूपच अप्रतिम होता, मात्र, मी घाबरली होती.